आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१४ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- शेतकऱ्यांचं हित साधण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- वक्फ सुधारणा विधेयकाबद्दल संभ्रम असण्याची गरज नाही, याबाबत अफवा पसरवू नये असं केंद्रीय अल्पसंख्याक मंत्र्यांचं आवाहन

**आणि**

- चीनमध्ये हुलुनबुईर इथं सुरु असलेल्या पुरुषांच्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं पाकिस्तानवर २-१ अशी मात

**<><><><><>**

शेतकऱ्यांचं हित साधण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी घेतलेले निर्णय अधोरेखित करत अशा निर्णयांमुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल तसंच ग्रामीण भागात अधिक रोजगार निर्माण होतील, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवरच्या पोस्टमध्ये व्यक्त केला आहे. देशाच्या अन्न सुरक्षेमध्ये शेतकऱ्यांची मोलाची भूमिका आहे, असं त्यांनी नमूद केलं आहे. कांद्यावरच्या निर्यात शुल्कात कपात करण्याच्या तसंच

खाद्यतेलावरचं आयातशुल्क वाढवण्याच्या निर्णयाचा फायदा शेतकऱ्यांनाच होणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या प्रचार मोहिमेचा प्रारंभ कुरुक्षेत्र इथे जाहीर सभा घेऊन केला. विकसित भारताचं स्वप्न साकार होण्यासाठी हरियाणाचा विकास महत्त्वाचा आहे, त्यादृष्टीनं सरकारनं हरियाणाला विकासाच्या प्रवाहात आणलं असल्याचं त्यांनी सांगितलं. गरीब, महिला, शेतकरी तसंच युवावर्गाला सक्षम बनवण्याचा सरकारचा संकल्प असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. आपल्या तिसऱ्या कार्यकाळात गेल्या १०० दिवसांत सुमारे १५ लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. लखपती दीदी कार्यक्रमांतर्गत केवळ १०० दिवसांत ११ लाखांहून अधिक महिला लखपती झाल्याचं उदाहरण त्यांनी दिलं.

**<><><><>**

देशाला एकसंध ठेवण्यात हिंदी भाषेची महत्त्वाची भूमिका असून या भाषेचं रक्षण आणि संवर्धन करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं राजभाषा हीरक जयंती उत्सवनिमित्त आयोजित चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते.

हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये कोणतीही स्पर्धा नसून त्या एकमेकांना पूरक असल्याचं शहा म्हणाले. मुलांना मातृभाषेत शिक्षण मिळावे, यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणावर विशेष भर दिल्याचंही त्यांनी सांगितलं. हिंदी राजभाषेच्या हीरक महोत्सवी वर्षाचं औचित्य साधत विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं लोकार्पण शहा यांनी केलं.

**<><><><>**

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्रात पुन्हा एनडीएचं सरकार आणण्याचं आवाहन केलं आहे. नड्डा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. आगामी विधानसभा निवडणुक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासोबत एकत्र लढवायची आहे, असं त्यांनी राज्याच्या भाजपा नेत्यांना सांगितलं. निवडणुकीत एनडीएचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी होतील यासाठी काम करण्याच्या सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या. नड्डा यांनी आज मुंबईत लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी आणि वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सवाला भेट देऊन गणपतीचं दर्शन घेतलं.

**<><><><>**

महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह आता शिगेला पोहचला आहे. येत्या १७ तारखेला अनंत चतुर्दशीच्या दिवशी १० दिवसांच्या गणपतीचं विसर्जन

होईल. पण त्यापूर्वी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी राज्यात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं आहे.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज मुंबईतल्या प्रसिद्ध गणपतींचं दर्शन घेतलं. मुंबईतला पहिला सार्वजनिक गणपती केशवजी नाईक चाळ, लालबागचा राजा, मुंबई सेंट्रलच्या हमाल मंडळाचा गणपती यांचा त्यात समावेश होता.

**<><><><><>**

स्वीडनमधल्या स्टॉकहोल्ममध्ये साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवात भारतीयांसोबतच स्थानिकांचाही सहभाग असतो. गेल्या १०-१५ वर्षात इथल्या गणेशोत्सवाच प्रमाण आकार वाढलाय, त्यात होणाऱ्या विविध कलागुण दर्शन कार्यक्रमांची संख्या वाढली आहे. याविषयी आकाशवाणीच्या श्रोत्यांना अनुजा कुलकर्णी यांनी अधिक माहिती दिली..

**होल्ड.. अनुजा कुलकर्णी, स्वीडन**

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाला सर्व प्रकारची मदत दिली जाईल, कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज मुंबईत पारसी समुदायाच्या एका कार्यक्रमात बोलत होते. पारसी समाजाची

घसरती लोकसंख्या हे या समुदायासमोरचं सर्वात मोठं आव्हान असून त्याचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार 'जियो पारसी' योजना राबवत असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकाबद्दल कुणाच्याही मनात कोणताही संभ्रम असण्याची गरज नाही. या विधेयकाबद्दल खोट्या गोष्टी पसरवून कुणीही नागरिकांची दिशाभूल करू नये, असंही ते म्हणाले.

रिजिजू यांनी आज 'भगवान बुद्ध यांच्या मध्यम मार्गाद्वारे भविष्यातील जागतिक नेतृत्वासाठी मार्गदर्शन' या विषयावरच्या परिषदेला संबोधित केलं. परोपकार आणि करुणा ही बुद्धांची शिकवण अंगिकारल्यावरच देशाला जगाचं नेतृत्व करता येईल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते राज्यातल्या ४३४ आयटीआय संस्थांमधे उभारण्यात आलेल्या संविधान मंदिरांचं उद्घाटन करणार आहेत.

उद्या दुपारी उपराष्ट्रपती नागपूर इथं पोहोचतील. नागपूरच्या रामदेवबाबा विद्यापीठातल्या डिजिटल टॉवरचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे.

राज्यपाल सी.पी राधाकृष्णन त्यांच्या सोबत असतील.

**<><><><><>**

दिव्यांगांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असून त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रश्न सोडवल्यानं आपल्याला समाधान मिळतं, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. नागपूर इथं आधार संस्था आणि वेकोलिच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र वितरित करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

बांबू लागवडीला प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशानं १८ सप्टेंबर हा दिवस जागतिक बांबू दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसानिमित्तानं महाराष्ट्र राज्य सरकार आणि लातूरच्या फिनिक्स फाऊंडेशनतर्फे मुंबईतील यशवंतराव प्रतिष्ठानमध्ये विशेष परिसंवादाचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

शासनाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्यांना देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमात सहभागी होण्यासाठीची मुदत १७ सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी या तारखेपर्यंत www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असं आवाहन शासनानं केलं आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात म्हणजेच ईफ्फीमध्ये नवोदित तरुण भारतीय चित्रपट निर्मात्यांसाठी एक नवीन विभाग सुरू केला आहे. "सर्वोत्कृष्ट नवोदित भारतीय चित्रपट विभाग २०२४" असे या विभागाचे नाव आहे. या नव्या

दालनात ईफ्फी चित्रपट महोत्सव यंदा २० नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर या कालावधीत गोव्यात होत आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ओणमनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. केरळमधला हा सुगीचा सण समृद्ध परंपरेचं आणि सांस्कृतिक वारशाचा निदर्शक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आपल्या संदेशात अन्नदाता शेतकऱ्यांप्रति त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये हुलुनबुईर इथं सुरु असलेल्या पुरुषांच्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं पाकिस्तानवर २-१ अशी मात केली. भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंह यानं भारताच्या बाजूनं दोन गोल केले. सहा संघांचा सहभाग असलेली ही स्पर्धा राऊंड-रॉबिन पद्धतीने खेळवली जात असून, १६ सप्टेंबर रोजी अव्वल चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. स्पर्धेचा अंतिम सामना १७ सप्टेंबरला होणार आहे.

**//<><><><><>//**